# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

नागपुरात दोन बालकांमध्ये एच एम पी व्ही विषाणूची लक्षणं आढळली आहेत. ही दोन्ही बालकं अनुक्रमे सात आणि १३ वर्ष वयाची आहेत. त्यांचे नमुने तपासणीसाठी पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था –एनआयव्हीकडे पाठवण्यात आले आहेत. नागपूर मेडिकलचे अधीक्षक आणि बालरोग तज्ज्ञ डॉ अविनाश गावंडे यांनी ही माहिती दिली. संशयित मुलं आता बरी झाली असून, त्यांना रुग्णालयात दखल करून घ्यायची गरज भासली नाही, मात्र अधिक खोलवर तपास करण्यासाठी नमुने एनआयव्हीकडे पाठवण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी या बालकांना एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्याचा फक्त संशय असल्याचं, स्पष्ट केलं आहे. अहवाल आल्यानंतरच याबाबत काहीतरी ठोस कारवाई करता येईल, असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, देशात एच एम पी व्ही या विषाणूचे रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी आज सद्य:स्थितीचा आढावा घेतला. या विषाणूमुळे नागरिकांना चिंता करण्याची गरज नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. देशातल्या श्वसनाच्या आजारांची सद्य:स्थिती आणि त्यांच्या व्यवस्थापनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु असलेल्या उपायांसंबंधी त्यांनी माहिती जाणून घेतली. राज्यांनी श्वसनाच्या आजारांवर आणि त्यांच्या प्रसारांवर देखरेख ठेवावी, योग्य उपाययोजना कराव्या आणि वेळोवेळी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करावी, असे निर्देश आरोग्य सचिवांनी यावेळी दिले.

****

नेपाळ आणि तिबेटच्या सीमावर्ती भागात आज सकाळी झालेल्या भूकंपात ३२ लोक ठार झाले, तर अनेक लोक जखमी झाले आहेत. तिबेटमध्ये झिझांग इथं केंद्र असलेल्या या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर सात पूर्णांक एक नोंदवली गेल्याचं, वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. सकाळी सहा वाजून ४० मिनिटांनी झालेल्या या भूकंपाचे देशातही राजधानी दिल्लीसह नोएडा, तसंच बिहार आणि सिक्कीमच्या काही भागात जोरदार धक्के जाणवल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केंद्रीय अन्वेषण विभागानं विकसित केलेल्या भारतपोल पोर्टलचा प्रारंभ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत करण्यात आला. आंतरराष्ट्रीय सहाय्यासाठी येणाऱ्या सर्व विनंत्यांची इंटरपोलद्वारे प्रक्रिया सुविहित करण्याचं काम भारतपोल पोर्टलच्या माध्यमातून करण्यात येईल. त्यामध्ये रेड नोटीस जारी करण्यासह इतर नोटिसांचा समावेश आहे.

****

सन १९७१मधे पाकिस्तानसोबत झालेल्या युद्धात महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या “विजयंता” या रणगाड्याची चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रावती इथल्या आयुध निर्माणी ‘चांदा’च्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आज स्थापना करण्यात आली. सेवानिवृत्तीनंतर विजयंता रणगाडा पुणे इथं आयुध निर्माणितील आगारात ठेवण्यात आला होता. विजयंता रणगाडा या युद्धातील विजयाची साक्ष म्हणून, नव्या पिढीला प्रेरणा देत राहील असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

****

शेतमालाची किमान आधारभूत किंमत – एमएसपी पेक्षा कमी दराने खरेदी होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना, राज्याचे कृषी आयुक्त रावसाहेब भागडे यांनी कृषी पणन मंडळाला दिल्या आहेत. शेतमालाची एमएसपीपेक्षा कमी दराने खरेदी झाली तर शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना संपर्क करण्याचं आवाहन त्यांनी केलं. शेतमालाच्या बाजार व्यवस्थापनाचं अचूक नियोजन करण्यासाठीच्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत ते पुण्यात बोलत होते. एमएसपी आणि प्रत्यक्ष बाजारभाव यांचं संनियंत्रण करण्यासाठीची यंत्रणा जिल्हा तसंच तालुका पातळीवर सक्रिय असावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

****

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीनं उद्यापासून पुण्यात तृणधान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल या महोत्सवात उपस्थित राहणार असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. उत्पादक ते ग्राहक थेट विक्री; या संकल्पनेअंतर्गत महोत्सवातल्या पन्नास दालनांमध्ये अस्सल तृणधान्यं आणि त्यापासून निर्मित नाविन्यपूर्ण असंख्य उत्पादनं विक्रीसाठी उपलब्ध असतील. तृणधान्य उत्पादन, तृणधान्यांच्या महत्त्वाबाबत तज्ज्ञांचं मार्गदर्शन, प्रात्यक्षिकं असे कार्यक्रम देखील महोत्सवात होणार आहेत.

****

परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील अन्नतंत्र महाविद्यालय आणि हैद्राबाद इथल्या ए सी ए बी सी मॅनेज यांच्या संयुक्त विद्यमाने “अन्न प्रक्रिया आणि मूल्यवर्धन” या विषयावर पाच दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन कुलगुरू डॉ.इन्द्र मणि यांच्या हस्ते काल झालं. हैद्राबादच्या केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेचे संचालक डॉ.व्ही.के.सिंग यावेळी उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि पुदुच्चेरी या पाच राज्यांतल्या २५ कृषी उद्योजकांनी नाव नोंदणी केली आहे.

****

शाकंभरी नवरात्र महोत्सवाला आज सुरुवात होत आहे. तुळजापुरात या महोत्सवात प्रमुख मानली जाणारी जलकुंभ यात्रा ११ जानेवारीला काढण्यात येणार असून, शाकंभरी नवरात्र महोत्सवाच्या काळात तुळजा भवानी देवीच्या विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहेत.

****